मा० न्यायालय

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** ठाणे शहर **P.S.(ठाणे):** उल्हासनगर **Year (वर्ष):** 2022

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0018 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 15/01/2022 09:29 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 14/01/2022

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 14/01/2022

**Time From (वेळेपासून):** 14:37 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 14:37 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 15/01/2022 **Time (वेळ):** 08:54 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 012 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 15/01/2022 09:29 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** रंगीला आईस्क्रीम अॅण्ड जनरल स्,सी ब्लॉक चौक,उल्हासनगर 1

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री. भारत अर्जनदास तोलाणी

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव):**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1969 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) Address (पत्ता):

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | ब्लॉक नं ए/08, रुम नं43,सी ब्लॉक चौक, गुरुद्वारासमोर,उल्हासनगर-1, जिल्हा ठाणे, उल्हासनगर,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | ब्लॉक नं ए/08, रुम नं43,सी ब्लॉक चौक, गुरुद्वारासमोर,उल्हासनगर-1, जिल्हा ठाणे, उल्हासनगर,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

Mobile (मोबाइल नं.): 91-9322392125

(j) Phone number (फोन नं.):

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | तुषार मारूती वायकर | | | 1. शाहू चाळ, महात्मा फुले नगर,, आरएसगेट जवळ, ,आंबिवली पुर्व, उल्हासनगर,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | सचिन हरिश्चंद्र जाधव | | | 1. प्लॉट नंबर 20, डी विंग,, राधे गोविंदनगर, शिवसेना शाखेस,अंबरनाथ, पुर्व,उल्हासनगर,ठाणे शहर,महाराष्ट्र, भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद उल्हासनगर, दिनांक:- 15/01/2022.मी, श्री. भारत अर्जनदास तोलाणी, वय-53 वर्ष, व्यवसाय- आईस्क्रीम अँन्ड जनरल स्टोअर, राहणार-ब्लॉक नं. ए/08, रुम नं.43, सी ब्लॉक चौक, गुरुद्वारासमारे, उल्हासनगर-1, जिल्हा ठाणे मोबाइल नंबर 9322392125.मी वरीलप्रमाणे असून, वर नमूद पत्त्यावर सन-1987 पासून माझे परिवारासह राहणेस आहे. मी दिनांक 11/01/2022 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयात हजर राहून, खालील आशयाची तक्रार दिली आहे.मी, वरील नमूद पत्त्यावर 1987 पासून माझे परिवारासह राहणेस आहे व त्याच पत्त्यावर 1997 पासून मी माझे रंगीला आईस्क्रीम अँण्ड जनरल स्टोअर चालवितो. मी राहात असलेले घर हे वडिलोपार्जित असून, सदरची रुम ही माझी आई कै. नानकीबाई अर्जनदास तोलानी हिचे नावावर आहे. परंतू तिचे सन 2001 मध्ये निधन झालेले आहे. मी राहात असलेले घर हे तळ अधिक एक मजली आहे. त्यातील तळमजल्यावरील पुढील भागात मी रंगीला आईस्क्रीम अँण्ड जनरल स्टोअर चालवितो व उर्वरित भाग हा राहाण्यास वापरतो. सदर रूमवर एम.एस.ई.बी., उल्हासनगर कार्यालयाकडून एकूण दोन लाईट मिटर लावण्यात आले असून, त्यापैकी रंगीला आईस्क्रीम अँण्ड जनरल स्टोअरसाठी कमर्षियल मिटर व उर्वरित घरासाठी घरगुती मिटर बसविण्यात आलेले आहेत. त्याचे बिल माझे आईचे नावावर येते व ते बिल मी स्वतः भरतो. माझे दुकानात 400 लिटरचे 03 फ्रिज असून ते कमर्षियल मिटरवर चालू आहेत.दिनांक 10/01/2022 रोजी मी माझे कामानिमित्त मुंबई येथे गेलो होतो. त्यावेळी 02:10 वा. चे. सुमारास मला माझे पत्नीचा मोबाईल फोनवर व्हॉटसअप कॉल आला व त्यावेळी तिने मला सांगितले की, एम.एस.ई.बी. कार्यालयातून दोन अधिकारी दुकानात आलेले आहेत व ते दुकान तपासणार असल्याचे सांगितले. त्यावेळी एम.एस.ई.बी. च्या कर्मचा-याने माझे पत्नीचे मोबाईलवरून माझेशी संभाषण केले. त्यावेळी त्यांनी मला दुकान तपासायचे असल्याचे सांगितले असता, मी त्यांना, आता मी बाहेर आहे व दुकानात माझी पत्नी आहे तरी तुम्ही उदया दुकान तपासण्यास या अशी विनंती केली असता, ते म्हणाले नाही मी महिला कर्मचारी मागवून

आजच दुकान चेक करणार आहे, असे सांगितले. त्यावर मी त्यांना ठिक आहे मग तुम्ही तपासून घ्या असे सांगितले. त्यावर ते म्हणाले ठिक आहे आज आम्ही तुमचे दुकान तपासून घेतो व उदया तुम्हाला भेटायला तुमच्या दुकानावर येतो. त्यावर मी त्यांना ठिक आहे असे म्हणून फोन कट केला.त्यानंतर दिनांक 11/01/2022 रोजी मी नेहमीप्रमाणे दुकानात हजर असतांना, दुपारी 01:30 वा.चे सुमारास एम.एस.ई.बी. कार्यालय, उल्हासनगर येथुन दोन कर्मचारी आले व त्यावेळी त्यापैकी एकाने त्यांचे नाव श्री.सचिन जाधव, एक्झीक्युटीव्ह इंजिनियर असे असल्याचे सांगुन काल आम्ही आलो होतो असे मला त्यांनी सांगितले व त्यांचे सोबत आलेल्या दुस-या कर्मचा-याने त्याचे नाव श्री.तुषार वायकर असे सांगितले. त्यावेळी श्री.जाधव साहेबांनी मला सांगितले की, तुम्ही जे घरात मिटर वापरत आहात त्या घरगुती मिटरवर आपण दुकान चालवत आहात त्यावर मी काल तुमच्यावर केस करणार होतो. परंतु तुम्ही इथे हजर नव्हता म्हणुन मी आज आलेलो आहे असे बोलुन, तुमच्या कमर्शियल मिटरवर एकुण 40 हजार रूपये पेनल्टी लावुन तसे बिल तुम्हाला पाठविणार होतो असे बोलुन, पुढे काय करायचे ? असे मला विचारले. त्यावेळी मी त्यांना, तुम्ही अधिकारी आहात तुमच्या हातात आहे काय करायचे ते, मी गरीब माणुस आहे. मी एवढे बिल भरले तर माझे खायाचे वांदे होतील असे त्यांना सांगुन काहीतरी मार्ग काढण्यास सांगितले. त्यावर श्री.सचिन जाधव व श्री.तुषार वायकर यांनी माझेवर कारवाई न करण्यासाठी व अधिकची पेनल्टी बिलाची रक्कम पुढील लाईट बिलामध्ये न लावण्यासाठी 15,000/- रूपये लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना माझेकडे एवढे पैसे नाहीत असे सांगितले परंतु त्यांनी माझे काहीएक ऐकुन घेतले नाही व पैशांची व्यवस्था करून ठेव आम्ही उदया परत येतो असे सांगुन, दोघेही माझे दुकानातुन निघुन गेले. मला लोकसेवक श्री.सचिन जाधव, एक्झीक्युटीव्ह इंजिनियर व श्री.तुषार वायकर एम.एस.ई.बी.कार्यालय, उल्हासनगर यांना लाचेची रक्कम देण्याची ईच्छा नसल्याने त्यांच्याविरुध्द कारवाई करणेकरीता मी दिनांक 11/01/2022 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे येथे हजर राहून तक्रार दिली आहे. त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 14/01/2022 रोजी सर्व कायदेशीर बाबींचा अवलंब करुन, डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावून पंच साक्षीदार श्री. मुकुंद भवारी, लिपिक/टंकलेखक, पिधावाटप कार्यालय क्र. 37 फ भिवंडी यांचे उपस्थितीत रंगीला आईस्क्रीम अँण्ड जनरल स्टोअर, उल्हासनगर याठिकाणी इतर लोकसेवक श्री. तुशार वायकर, मिटर रिडर यांचेविरुध्द केलेल्या पडताळणी कारवाईत माझेवर कारवाई न करणेकरीता तसेच पुढील लाईट बिलात पेनल्टी (दंड) रक्कम न लावण्यासाठी, इतर लोकसेवक श्री. तुषार वायकर यांनी स्वतःसाठी व लोकसेवक श्री. सचिन हरिश्चंद्र जाधव, सहाय्यक लेखापाल यांचेकरीता 15,000/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निश्पन्न झाले. तसेच सदरचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरवर ध्वनीमुद्रीत झालेले आहे. वरीलप्रमाणे इतर लोकसेवक यांनी माझेकडे 15,000/- रुपये लाचेची मागणी करुन ती स्वीकारण्याचे मान्य केल्याने, तसेच सदरची रक्कम त्यांना अल्पवधीतच द्यावयाची असल्याने पोनि ढगे-पाटील यांनी सुरु असलेल्या कारवाईमध्ये पडताळणी पंचनामा, सापळापूर्व पंचनामा व सापळा पंचनामा स्वतंत्रपणे करणे करीता पुरेसा अवधी नसल्याने, सदर कारवाईमध्ये पडताळणी, सापळापुर्व व सापळा पंचनामा एकत्रित करण्याचा निर्णय घेतला. तसेच लाचेची रक्कम देण्यास विलंब झाल्यास इतर लोकसेवक श्री. तुषार वायकर यास संशय येवू नये म्हणून लागलीच रंगीला आईस्क्रीम अँण्ड जनरल स्टोअर, उल्हासनगर येथे सापळा पुर्व पंचनामा कारवाई करण्याचा निर्णय पोनि ढगे पाटील यांनी घेतला व त्यानंतर पोनि ढगे पाटील यांनी मला इतर लोकसेवक श्री. वायकर यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर, इतर लोकसेवक श्री.वायकर यांना त्यांचे मोबईल फोनचा स्पिकर ऑन करून, लोकसेवक श्री.सचिन जाधव यांना फोन लावुन लाचेची रक्कम इतर लोकसेवक श्री. वायकर यांना देत असल्याबाबत सांगावे. जेणेकरून लोकसेवक श्री.सचिन जाधव यांचे संभाषण व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत होईल अशा सुचना दिल्या. त्यानंतर पोनिरी ढगे पाटील यांनी पंचासमक्ष मला इतर लोकसेवक श्री. तुषार वायकर यांनी मागणी केल्याप्रमाणे त्यांना देण्यासाठी लाचेची रक्कम 15,000/-रु. आहे काय? याबाबत विचारले असता, माझेकडे माझे स्वबचती मधले 15,000/-रु असल्याचे सांगितले.त्यानंतर पोनिरी श्रीमती ढगे पाटील यांचे सुचनेनुसार मी माझ्याकडे असलेली रक्कम 15,000/-रू. हजर केले असता नोटांचे नंबर नोंदवून त्यास अँन्थ्रासीन पावडर लावून, त्याचे प्रात्यक्षिक अल्ट्रा व्हाइलेट दिव्याच्या प्रकाषात करुन देवून सापळापुर्व कारवाई करण्यात आली. व रंगीला आईस्क्रीम अँण्ड जनरल स्टोअर, उल्हासनगर येथे सापळा आजमाविण्याचा निर्णय पोनि श्रीमती ढगे पाटील यांनी घेतला. त्याअनुषंगाने मला व सापळा पथकास आवश्यक त्या सुचना देण्यात आल्या. त्यानंतर पोनि ढगे पाटील यांचे सुचनेप्रमाणे पोहवा/कोळी व पोना/लोटेकर असे माझे रंगीला आईस्क्रीम अँण्ड जनरल स्टोअर्स दुकानाच्या बाहेरील रस्त्यावर कोणास संशय येणार नाही अशा रितीने सापळा लावुन थांबनु राहिले. त्याचवेळी उर्वरित सापळा पथक पो.निरी. ढगे-पाटील व पोना/पोटे तसेच पंच नंबर 2 श्री. संदिप खंडारे असे माझे राहते घराचे पहिल्या मजल्यावर लोकसेवकास संशय येणार नाही अशा रितीने थांबुन राहिले. त्यानंतर दुपारी 14:20 वा.चे सुमारास इतर लोकसेवक श्री. तुशार वायकर यांचा मला फोन आला व ते थोडया वेळाने दुकानात येत असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे पो.निरी.ढगे-पाटील यांनी मला माझे मुलास, इतर लोकसेवक श्री. वायकर दुकानात आल्यानंतर लागलीच मला आवाज देवुन बोलविणेबाबत सुचना देण्यास सांगितल्या. त्याप्रमाणे मी माझे मुलास सुचना दिल्या.त्यानंतर थोडया वेळाने माझे मुलाने दुकानातुन मला आवाज दिला व इतर लोकसेवक श्री.वायकर आले असल्याचे सांगुन, दुकानात बोलविले त्यानंतर पोना/पोटे यांनी डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून तो माझे शर्टचे आतील बनीयानमध्ये सुरक्षित ठेवुन दिल्यानंतर पो.निरी.ढगे-पाटील यांचे सुचनेप्रमाणे मी व पंच श्री.भवारी असे इतर लोकसेवक श्री.वायकर यांची भेट घेण्याकरीता तळमजल्यावर माझे दुकानात गेलो. त्यावेळी इतर लोकसेवक वायकर यांना मी आता तुम्हाला पंधरा हजार रूपये देतो तर तेवढ फोन करून साहेबांना सांगा पैसे दिल्याचे नाहीतर कन्फर्म कसे होणार, नंतर काही प्रॉब्लेम तर नाही ना होणार असे सांगितले असता, इतर लोकसेवक श्री. वायकर यांनी त्यांचे मोबाईल फोनवरून इतर लोकसेवक श्री. सचिन जाधव यांना स्पिकर ऑन करून फोन केला व लोकसेवक सचिन जाधव यांना तिथे आलोय ते पंधरा देत आहेत असे सांगितले असता, समोरून लोकसेवक सचिन जाधव यांनी ठिक आहे असे उत्तर दिले. त्यानंतर मी लोकसेवक श्री.सचिन जाधव यांचेशी फोनवर संभाषण केले व त्यावेळी मी त्यांना पंधरा हजार रूपये देतो असे सांगितले असता, त्यांना माझा आवाज ऐकु येत नसल्याचे भासवत होते व त्याच वेळी लोकसेवक सचिन जाधव यांनी ते ऐकले असल्याचे मला इतर लोकसेवक वायकर यांनी सांगितले व त्यास सचिन जाधव यांनी चालेल चालेल असे दोन वेळा बोलुन संमती दर्शविली. त्यानंतर मी इतर लोकसेवक वायकर यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम 15,000/- रुपये मागितली, त्यावेळी मी, माझे शर्टाच्या उजव्या खिशातून लाचेची रक्कम 15,000/- रुपये काढून इतर लोकसेवक वायकर यांचेसमोर हजर केले असता त्यानी लाचेची रक्कम त्यांचे उजवे हाताने स्विकारली व त्याचवेळी मी माझे हातातील स्टीलचा रिकामा ग्लास जमीनीवर आदळुन पुर्व नियोजित इशारा केला. मी केलेला इशारा पाहुन, पो.निरी.ढगे-पाटील, पोना/पोटे, पोहवा/कोळी, पोना/लोटेकर, व दोन्ही पंच असे माझे जवळ आले व लाचेची रक्कम स्विकारणा-या लोकसेवकाबाबत मला विचारले असता, मी इतर लोकसेवक श्री.तुषार वायकर यांचे कडे इशारा करून हेच इतर लोकसेवक श्री.वायकर असुन त्यांनीच आता माझेकडुन लाचेची रक्कम स्विकारली असल्याचे सांगितले. त्याचवेळी इतर लोकसेवक श्री. तुशार वायकर यांना तक्रारदार यांचेकडून स्विकारलेली लाचेची रक्कम खाली जमीनीवर टाकून दिली. त्यानंतर पोनि ढगे-पाटील यांचे सुचनेनूसार इतर लोकसेवक वायकर यांनी तेथेच खाली जमिनीवर टाकलेली लाचेची रक्कम पंच नंबर 2 श्री. खंदारे यांनी उचलून स्वतःचे ताब्यात ठेवली. त्याचवेळी पोहवा कोळी यांनी लोकसेवक यांचा उजवा हात व पोना लोटेकर यांनी लोकसेवक यांचा डावा हात मनगटाजवळ घट्ट धरून ठेवले. ती वेळ 14:37 वाजताची होती. त्यानंतर पो.नि. ढगे पाटील यांनी स्वतःची व दोन्ही पंचांची तसेच सापळा पथकातील कर्मचा-यांची इतर लोकसेवक श्री. तुषार वायकर यांना ओळख करून देवुन लाचेची रक्कम स्विकारणा-या इतर लोकसेवक श्री. तुषार वायकर यांना पुढील कारवाईकामी ताब्यात घेण्यात आले.

वरीलप्रमाणे सापळा कारवाई झाल्यानंतर सापळा कारवाई दरम्यान व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत संभाषण ऐकल्यानंतर, लोकसेवक श्री.सचिन जाधव हे इतर लोकसेवक श्री.तुषार वायकर यांस माझेकडे लाचेची मागणी करण्यास व ती स्विकारण्यास प्रोत्साहन देत असल्याचे निश्पन्न झाल्याने, व त्यांचे हे कृत्य भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 (सुधारणा अधिनियम 2018) चे कलम 12 अन्वये अपराधास पात्र असल्याने लोकसेवक श्री.सचिन जाधव यांना सदर प्रकरणी ताब्यात घेण्याचा पो.निरी.ढगे-पाटील यांनी निर्णय घेतला.त्याप्रमाणे पो.निरी.ढगे-पाटील यांनी लोकसेवक श्री.सचिन जाधव यास किशोर पटीस, गोल मैदानाजवळ,उल्हासनगर 1 येथुन पुढील कारवाईकामी ताब्यात घेतले व त्यास त्याचे नाव विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव सचिन हरिश्चंद्र जाधव, वय. 35 वर्ष, व्यवसाय-नोकरी, सहाय्यक रोखपाल, कार्यालय अतिरिक्त कार्यकारी अभियंता कार्यालय, एम.एस.ई.बी., उप विभाग-1, उल्हासनगर नंबर 1 बस स्टॉपजवळ, राहणा [illegible]

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**

**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): ~~SANTOSH GOPAL UBALE~~ पल्लवी ढगे पाटील

**Rank** (पद): SI (Sub-Inspector)

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) **.**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

P.S.I.
पोलीस ठाणे अंमलदार
उल्हासनगर पोलीस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): RAJENDRA BHUJANGROW KAD

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):